शैक्षणिक संदर्भ अंक १३१ ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

महा इतिहास - भाग १३

# भटक्यांची जीवनशैली

लेखक: प्रियदर्शिनी कर्वे

महा इतिहास - भाग १३

# भटक्यांची जीवनशैली

**लेखक: प्रियदर्शिनी कर्वे**

*मागच्या लेखात आपण पाहिले की पाठोपाठच्या हिमयुगांमुळे निर्माण झालेल्या जीवनावश्यक संसाधनांच्या कमतरतेवर मात करण्याच्या प्रयत्नांत होमो सेपियन मानव सर्व जगभर पसरले आणि इतर मानवी प्रजातींचे अस्तित्व मिटवून त्यांनी सर्वत्र आपला जम बसवला. या लेखात या भटक्यांची जीवनशैली समजून घेऊया.*

साधारण १२,००० वर्षांपूर्वी पृथ्वीवरील मानवी समाजाची परिस्थिती काय होती?

अंटार्क्टिका सोडल्यास इतर प्रत्येक खंडावर आता होमो सेपियन माणसे वावरत होती. ही माणसे टोळ्यांमध्ये रहात होती आणि प्रत्येक टोळी आपापल्या ठरावीक क्षेत्रात वर्षभरातील मोसमी बदलांनुसार फिरत राही. आपल्या परिसराच्या निरीक्षणांमधून आणि आपल्या जीवनानुभवांमधून हे लोक शिकत होते आणि आपले ज्ञान आपल्या टोळीतील इतरांपर्यंत, आपल्या संपर्कातील इतर टोळ्यांपर्यंत आणि आपल्या पुढच्या पिढीपर्यंतही पोहचवत होते. यातून समूहातील आणि शेजारातील प्रत्येकाला एकमेकांच्या तसेच प्रत्येक पिढीला आपल्या पूर्वसुरींच्या ज्ञानाचा लाभ मिळत होता.

या माणसांची भटकी जीवनशैली ही मुख्यतः परिसराचा धांडोळा घेऊन जीवनावश्यक असलेली संसाधने गोळा करण्यावर आधारित होती. अन्न-पाणी आणि थंडी-वारा-पाऊस इ.

पासून तसेच इतर मोठ्या प्राण्यांपासून संरक्षण, या त्यांच्या मूलभूत गरजा होत्या. टोळयांमध्ये



कुटुंबसंस्था अस्तित्वात आलेली होती आणि लहान बालकांच्या संरक्षण आणि संगोपनाची विशेष काळजीही घेतली जात होती. आपल्या गरजा भागवण्यासाठी या माणसांनी विविध तंत्रे विकसित केली होती आणि हाच माणसांच्या टोळया आणि इतर प्राण्यांच्या टोळया यातला मूलभूत फरक होता.

टोळीने रहाणारे आणि टोळीत एक विशिष्ट सामाजिक व्यवस्था पाळणारे इतरही प्राणी आहेत. आपले सर्वात जवळचे नातेवाईक असलेली माकडे, तसेच हत्ती ही उदाहरणे सर्वांच्या परिचयाची आहेत. पण आपल्या गरजा भागवण्यासाठी सामूहिकरित्या विविध प्रकारची तंत्रे विकसित करणे आणि त्यांचा प्रभावीपणे वापर करून आपल्या नैसर्गिक कमकुवतपणावर मात करण्याचे जे कौशल्य मानवांमध्ये आहे, ते दुसऱ्या कोणत्याही प्राणीप्रजातीमध्ये आढळत नाही.  तसेच एकाच तंत्राचा वापर करून अनेक गरजा भागवण्यातही माणसांचा हात कोणी धरू शकत नाही. मानवाच्या मेंदूच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्क्रांतीमुळे, तसेच उभे राहून चालणे, हाताच्या अंगठ्याचा वापर, इ. शारीरिक वैशिष्ट्यांमुळे हे शक्य झाले आहे.

उदा. विशिष्ट पध्दतीने कोरडी लाकडे रचून आणि गारगोटीचा वापर करून नियंत्रित आग निर्माण करण्याचे तंत्र माणसाने विकसित केले. आगीचा वापर थंडीत ऊब मिळवण्यासाठी होतो, तिचा वापर करून इतर धोकादायक प्राण्यांना घाबरवून हुसकून लावता

येते आणि अन्नही शिजवून खाता येते. शिजवण्याच्या प्रक्रियेमुळे एरवी खायला अवघड किंवा पचायला अवघड अशा गोष्टीही खाणे आणि त्यांतून पोषण मिळवणे शक्य झाले. यामुळे आहारातील वैविध्य वाढले आणि पर्यायाने अन्नसुरक्षितताही वाढली.

एकंदरच भटक्या माणसांसाठी संसाधनांच्या शोधात आपल्या टोळीच्या सुरक्षित गोटातून बाहेर पडणे – मग ते धुंडाळण्यासाठी (फोरेजिंग) असो किंवा शिकारीसाठी (हंटिंग) – म्हणजे जिवाला धोकाच होता. पण विविध तंत्रांच्या मदतीने प्रत्येक फेरीतून जास्तीत जास्त साध्य करण्याचा प्रयत्न करून हा धोका कमी केला जात होता. यामध्ये प्रत्येक फेरीनंतर आलेल्या अनुभवसिध्द ज्ञानाची आणि मिळालेल्या माहितीची परस्परांमध्ये देवाणघेवाणही महत्त्वाची भूमिका बजावत होती. एका अर्थाने हे प्राथमिक स्वरूपाचे माहिती तंत्रज्ञान विकसित होत होते, असेही म्हणता येईल.




***भटक्या मानवांनी खडकांवर काढलेली चित्रे.***

***डावीकडील छायाचित्र मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील आहे तर उजवीकडील छायाचित्र आफ्रिकेतील नामीबिया देशातील आहे.***

आपल्या परिसरात सापडणाऱ्या पदार्थांपासून आपल्या उपयोगाची तंत्रे निर्माण करतानाच या माणसांनी कलेचीही निर्मिती केली. गुहांमधील भित्तीचित्रे, दगडांचा, बियांचा, वगैरे वापर करून बनवलेली विविध प्रकारची आभूषणे, इ. स्वरूपात या माणसांचे

कलाविष्कार आजही आपल्याला पहाता येतात. आज निसर्गाधिष्ठित जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या नृत्य आणि गायनवादनातून आद्य भटक्या लोकांनी निर्माण केलेल्या इतर कलांचे अवशेषही शिल्लक आहेत.

लिंगभावाच्या आजच्या प्रचलित धारणांमुळे पुरूष शिकार करत असावेत आणि महिला धांडोळा घेत असाव्यात, असा एक समज होता. पण आपले सर्वात जवळचे नातेवाईक आणि भटक्या माणसांच्या जीवनशैलीशी साधर्म्याचे जीवन जगणाऱ्या चिंपांझी



माकडांच्या समूहांमध्ये साधारण ३५ टक्के शिकार ही माद्यांकडून केली जाते. चिंपाझी माद्या नरांच्या सहकार्याशिवाय आपले आणि आपल्या मुलांचे पोट भरायला समर्थ असतात. आजच्या आदिवासी समाजातही अशी कामाची सरसकट विभागणी दिसत नाही. कालाहारी वाळवंटातील सान आदिवासींमध्ये परिसरातून धुंडाळून अन्नपदार्थ मिळवण्याचे काम पुरूष करतात तर फिलिपाईन्समधील आग्टा आदिवासींमध्ये महिला शिकार आणि मासेमारी करतात. त्यामुळे भटक्या समूहांमध्ये शिकार कोणी करायची आणि धांडोळा कोणी घ्यायचा हे लिंगभेदावर ठरत नसावे; तर स्थानिक परिस्थिती, व्यक्तिगत कौशल्ये व ज्ञान, प्रासंगिक गरजा, आणि महिलांचे पुनरुत्पादनाचे चक्र, इ. गोष्टींवरून ठरत असावे, असे दिसते.

भटक्या लोकांचे जीवन सातत्याने संघर्षपूर्ण आणि खडतरच असावे असे बराच काळ मानले जात होते. पण आजही भटके जीवन जगणाऱ्या समूहांच्या अभ्यासातून ही धारणा बदलली. भटक्या माणसांच्या गरजा मुळात कमी होत्या आणि ती फक्त आजचा विचार करत

होती. आजच्या पोट भरण्याची आणि सुरक्षिततेची सोय करण्यासाठी दिवसातील ३-४ तास काम केले की उरलेला वेळ मित्रमैत्रिणींबरोबर संवाद साधण्यात, मुलांशी खेळण्यात, त्यांना विविध कौशल्ये शिकवण्यात, जोडीदाराबरोबर गुजगोष्टी करण्यात, कलाविष्कारात घालवला जात असावा. उद्याचा नवा दिवस नवी आव्हाने घेऊन येई आणि कदाचित आज भरल्या पोटी आनंदात जगलेला माणूस उद्या शिकार करताना जायबंदी होऊन किंवा एखाद्या झाडाची फळे तोडताना तोल जाऊन पडल्याने प्राणाला मुकतही असे. वैविध्यपूर्ण आहारामुळे भटकी माणसे बऱ्यापैकी निरोगी जरी असली तरी जिवाच्या धोक्यांनी आणि आव्हानांनी भरलेल्या जगात त्यांचे आयुष्यमान जेमतेम २०-३० वर्षांच्या आसपास असावे.

एक लाख वर्षांपेक्षा अधिक काळ जगत असलेली आणि जगभरातील मानवी समूहांमध्ये प्रचलित असलेली ही जीवनशैली साधारण ११,००० वर्षांपूर्वी का बदलली?

पुरातत्वीय अभ्यासांमधून असे दिसते की १२,००० ते १०,००० वर्षांपूर्वीच्या कालावधीत काही विशिष्ट ठिकाणच्या मानवी समूहांकडून काही नवी तंत्रे विकसित केली गेली. या तंत्रामुळे तिथल्या लोकांना कमी क्षेत्रातून अधिक ऊर्जा आणि संसाधने प्राप्त करणे शक्य झाले. या संपन्नतेमुळे लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली आणि छोट्या छोट्या भटकणाऱ्या टोळयांच्या तात्पुरत्या मोसमी वसाहतींची जागा शेती व पशुपालकांच्या कायमस्वरूपी खेड्यांनी आणि अधिक गुंतागुंतीची सामाजिक रचना असलेल्या नगरांनी घ्यायला सुरूवात केली.

शेती व पशुपालनामुळे मानवी समाजात एका आर्थिक आणि सांस्कृतिक क्रांतीची पायाभरणी झाली. यामुळे पृथ्वीवरील इतर कोणत्याही मोठ्या प्राण्यांपेक्षा अगदी वेगळया मार्गावर मानवी समाज वाटचाल करू लागला. मानवी समाजाची ही वेगळी वाटचाल सर्वत्र

एकसारखी झालेली नाही. शेतीवर आधारित जीवनशैलीचे लोण आशिया, आफ्रिका आणि दक्षिण युरोपच्या बऱ्याचशा भागांमध्ये झपाट्याने पसरले. अमेरिका व पॅसिफिक महासागरातील भूभाग तसेच ऑस्ट्रेलिया व लगतच्या भागांतील मानवी समूह मात्र बराच दीर्घ काळ या संक्रमणापासून अलिप्त राहिले.

शेती व पशुपालनाची सुरूवात ज्या भागांमध्ये झाली तिथल्या मानव समूहांचे या नव्या जीवनशैलीकडे खूप झपाट्याने संक्रमण झाले. या पहिल्या स्थिरावलेल्या मानव समूहांच्या संपर्कात असलेल्या इतर समूहांपैकी काहींनी हा बदल स्वेच्छेने अंगीकारला तर काहींनी याला विरोधही केला. संख्याबळ आणि अधिक प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर शेतकरी समूहांनी अधिकाधिक जमीन ताब्यात घेत जबरदस्तीने हा बदल परिसरातील भटक्या समूहांच्या गळी उतरवल्याच्या घटनाही घडल्या. काही ठिकाणी शेती करणाऱ्यांची विस्तारित लोकसंख्या भटक्यांच्या परिसरात पसरत गेली आणि या नव्या लोकांच्या प्रभावामुळे त्या भागात वावरणाऱ्या आदिम समुदायांना बदलणे भाग पडले.



इतिहासात आणि बऱ्याच लोकसाहित्यातही नागरी समुदाय नीतीमान व सुसंस्कृत आणि भटके समुदाय लुटेरे व विध्वसंक अशी मांडणी केली जाते. पण प्रत्यक्षातली परिस्थिती याच्या विरुध्द होती. शेती व पशुपालनासाठी भरपूर पाणी आणि संसाधने असलेल्या जमिनींवर स्वामित्व प्रस्थापित करणे आवश्यक होते. या जमिनींमध्ये परंपरेने वावरणारे भटके मग प्रतिस्पर्धी आणि धोकादायक वाटणे साहजिकच होते. शेतकरी व पशुपालकांची संख्या जास्त होती आणि तांत्रिक दृष्ट्याही ते सर्वस्वी वरचढ होते. त्यामुळे आक्रमकांच्या भूमिकेत शेतकरी होते तर पराभूत विस्थापितांच्या भूमिकेत भटके.

हे चित्र आजही फार बदलले आहे असे नाही, फक्त तेव्हा सुपात असलेले शेतकरी व पशुपालकही आज जात्यात आले आहेत. पण इतिहास हा नेहमी जेते लिहितात आणि त्याचा मुख्य उद्देश स्वतःचे उदात्तीकरण करणे हा असतो! आजचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा खाणकाम करणाऱ्या, मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभे करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या या नायक आणि त्यांना विरोध करणारे स्थानिक समूह हे खलनायक असे चित्र गडदपणे रंगवले जाईल का? की आजचे वर्तमान इतिहास म्हणून अभ्यासले जाण्याइतका काळ पृथ्वीवर मानवी अस्तित्वच रहाणार नाही?

मानवी इतिहासाला कलाटणी देणाऱ्या ह्या शेतीच्या क्रांतीचे बारकावे समजून घेणे महत्त्वाचे आहे. आजच्या घडीला मानवी समाजाने केलेली प्रगती असो किंवा मानवापुढील आव्हाने असो, या सर्वांचे मूळ या क्रांतीकारी संक्रमणामध्ये आहे. या क्रांतीने केवळ माणसांनाच बदलवले असे नाही, तर ज्या वनस्पती आणि प्राणी प्रजाती शेती आणि पशुपालनाद्वारे माणसाळवल्या गेल्या त्यांच्यातही अपरिवर्तनीय असे बदल झाले. दीर्घकाळ चाललेला हिमयुगाचा कालावधी संपल्याने वातावरणीय परिस्थितीत झालेला बदल हे या

संक्रमणाचे महत्त्वाचे कारण मानले जाते. आजही आपण वातावरणीय बदलांना तोंड देत आहोत. त्यामुळे शेतीच्या क्रांतीच्या धर्तीवर आणखी एखादी जीवनशैली बदलून टाकणारी क्रांती मानवी भविष्याला कलाटणी देऊ शकेल का? हे केवळ कालौघात जसे घडेल तसे घडू न देता आपण नियोजनबद्ध पध्दतीने, संघर्ष टाळून, घडवून आणू शकतो का? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी शेतीच्या क्रांतीचा डोळसपणे महा-ऐतिहासिक अभ्यास करणे आवश्यक आहे. पुढच्या लेखात आपण याचीच चर्चा करूया.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी – बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: भटक्या मानवांची जीवनशैली, भटक्या मानवांचे तंत्रज्ञान, भटक्या मानवांचे कलाविष्कार, शेती व पशुपालन)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***